ePaper

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा अचानक पंढरपूर दौरा!



| वर्ष - 7 । अंक -59 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**


- प्रवाशांच्या जीवाशी खेळ!
- सोसायटीधारकांच्या समस्यांसाठी महापालिका प्रशासनाचा 'मास्टर प्लॅन'!


www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 26 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# अनर्थ टळला!

## » निगडीत गॅसचा टँकर पलटी : 300 मीटर परिसर पूर्णपणे बंद



## » पुणे-मुंबई महामार्गावर 'भारत पेट्रोलियम'चा गॅस टँकर पलटी; अधिकाऱ्यांसह 50 पोलीस घटनास्थळी

।पिंपरी। महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**चालकाचा ताबा सुटल्याने भारत पेट्रोलियम कंपनीचा गॅसवाहू टँकर रविवारी पहाटे साडेतीनच्या सुमारास निगडीत पलटी झाल्याने गॅस गळती झाली. टँकरमध्ये तब्बल १८ हजार किलो गॅसचा साठा असल्याने आणि भर वस्तीत ही दुर्घटना घडल्याने पुढील धोका लक्षात घेऊन खबरदारी म्हणून घटनास्थळापासून ३०० मीटर पर्यंतचा परिसर पूर्णपणे बंद केला होता. सायंकाळी साडेपाच वाजता गॅस गळती पूर्णपणे थांबविण्यात यश आले.**



या अपघातात टँकर चालक राजेंद्र कुमार यादव हा गंभीर जखमी असून त्याला उपचारासाठी महापालिकेच्या वायसीएम रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. महापालिका अग्निशमन दल, आपत्ती व्यवस्थापन विभाग, पोलिस आणि बीपीसीएल पथकाच्या अथक परिश्रमामुळे कोणतीही जिवीत वा वित्तहानी न होता गळती थांबविण्यात यश आले. भारत पेट्रोलियम कंपनीचा एलपीजी गॅसवाहू टँकर मुंबईहून सोलापूरकडे जात होता. पहाटे साडेतीनच्या सुमारास निगडी येथील भक्ती-शक्ती पुलाजवळ टँकर येताच चालकाचा गाडीवरील ताबा सुटला आणि टँकर पलटी झाला.

यावेळी झालेल्या प्रचंड मोठ्या आवाजाने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले. परिसरातील नागरिकांनीही घटनास्थळी धाव घेतली. टँकरच्या केबिनमध्ये चालक यादव हे अडकले होते. नागरिकांनी त्यांना बाहेर काढून रूग्णालयात हलविले. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच निगडी पोलीसांसह महापालिका अग्निशमन दलाचे बंब घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर आपत्ती व्यवस्थापन विभाग, भारत पेट्रोलियमचे पथकही दाखल झाले. टँकरमध्ये तब्बल १८ टन गॅस असल्याने आणि लिक्वीड गॅस रस्त्यावर सांडला असल्याने खबरदारी म्हणून पोलीसांनी घटनास्थळापासून ३०० मीटर पर्यंतचा परिसर पूर्णपणे बंद केला.परिसरातील वाहतुकही बंद करण्यात आली. नागरिकांनाही सतर्कतेचा इशारा देण्यात आला.



## पुणे- मुंबई महामार्गावरील वाहतूक विस्कळीत...

»दरम्यान, या दुर्घटनेमुळे पुणे – मुंबई महामार्गावरील वाहतुकही रूपीनगर आणि निगडी – ट्रान्सपोर्टनगर येथून वळविण्यात आली. घटनास्थळी अग्निशमन दलाचे पाच बंब, पाच क्रेन, एक रूग्णवाहिका तैनात ठेवण्यात आली. अग्निशमन जवानांकडून गॅस पसरू नये यासाठी सातत्याने पाण्याचा मारा करण्यात येत होता. बीपीसीएल कंपनीमार्फत अपघातग्रस्त टँकरमधील गॅस दुसऱ्या टँकरमध्ये भरण्यासाठी टँकर मागविण्यात आला. त्यानंतर मशीनद्वारे अपघातग्रस्त टँकरमधील गॅस दुसऱ्या टँकरमध्ये भरण्यात आला. दुपारी अडीचच्या सुमारास चार क्रेनच्या सहाय्याने गॅस टँकर सरळ उभा करण्यात आला. मात्र, गॅस गळती होत असल्याने ती थांबविण्याचे काम युद्धपातळीवर सुरूच होते. सायंकाळी साडेपाचच्या सुमारास गॅस गळती पूर्णपणे थांबविण्यात यश आले.

# पुण्यात मोसमी पाऊस सुरू!

## » एकाच दिवसांत व्यापला देशाचा मोठा भाग

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बराच काळ प्रतीक्षा करायला लावल्यानंतर मोसमी वाऱ्यांनी मुंबई, पुण्यासह राज्य व्यापले आहे. मुंबई आणि पुण्यात आज मोसमी पाऊस सुरू झाल्याचे जाहीर करण्यात आले आहे. विशेष म्हणजे एकाच दिवसात मोसमी वाऱ्यांनी देशाचा मोठा प्रदेश व्यापला आहे.**

यंदा एल-निनो हा घटक सक्रिय झाला आहे. तसेच जूनच्या पहिल्या आठवड्यात अरबी समुद्रात बिपरजॉय या चक्रीवादळाची निर्मिती झाली. त्यामुळे दरवर्षीच्या तुलनेत आठ दिवस विलंबाने ८ जूनला मोसमी वारे केरळात दाखल झाले.

त्यानंतर कोकणात पोहोचलेल्या मोसमी वाऱ्यांसाठी अनुकुल परिस्थिती असूनही मोसमी वाऱ्यांची फारशी प्रगती झाली नाही. त्यामुळे मुंबई, पुण्यासह उर्वरित महाराष्ट्राला पावसाची प्रतीक्षा करावी लागत होती. शुक्रवारी मोसमी पाऊस विदर्भात दाखल झाला. तर शनिवारी मध्य महाराष्ट्र, पुणे, मुंबईत पाऊस सुरू झाला. बराच काळ प्रतीक्षा केल्यानंतर अखेरीस पाऊस सुरू झाल्याने दिलासा मिळाला आहे.

हवामानशास्त्र विभागाच्या पुणे वेधशाळेचे शास्त्रज्ञ अनुपम कश्यपी यांनी दिलेल्या माहितीनुसार, मोसमी वाऱ्यांनी मुंबई, पुण्यासह संपूर्ण राज्य व्यापले आहे.

त्यामुळे मुंबई आणि पुण्यात मोसमी पाऊस सुरू झाला आहे. विशेष म्हणजे, एकाच दिवसात मोसमी वाऱ्यांनी देशाचा मोठा प्रदेश



व्यापला आहे. दरम्यान पुणे आणि परिसरातील गेल्या चोवीस तासांत पडलेल्या पावसाचा आढावा घेतला असता लोणावळा येथे सर्वाधिक ६१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. त्यानंतर गिरीवन येथे ४२ मिलीमीटर, लवासा येथे ३४.५ मिलीमीटर, एनडीए येथे २९ मिलीमीटर, बारामती येथे २६.६ मिलीमीटर पाऊस पडला.

> बंगालच्या उपसागरात ओडिसा, पश्चिम बंगालपर्यंत चक्रिय स्थिती तसेच अरबी समुद्रात गुजरातच्या किनारपट्टीपर्यत हवेच्या वरच्या भागात चक्रिय स्थिती तयार झाली आहे. या दोन्ही स्थितीमुळे मान्सूनने शनिवारी अलिबाग, कोल्हापूर, नागपूरपर्यत धडक मारली. येत्या चोवीस तासात पुणे, मुंबईस उर्वरित महाराष्ट्र व्यापणार आहे. तसेच २८ जूनपर्यत राज्यात चांगला पाऊस बरसणार आहे.
>
> - **अनुपम कश्यपी,**
> हवामानशास्त्रज्ञ, भारतीय हवामानशास्त्र पुणे.

### मोसमी वाऱ्यांनी महाराष्ट्र व्यापला

**»पुणे: बंगालच्या उपसागरात तयार झालेली चक्रिय स्थिती तसेच उत्तर पूर्व अरबी समुद्रात चक्रिय स्थिती तयार झाली आहे. ही स्थिती नैऋत्य मोसमी वारे पुढे सरकण्यास पोषक आहे. त्यामुळे शनिवारी मोसमी वाऱ्यांनी कोकणातील अलिबाग, मध्य महाराष्ट्रातील कोल्हापूर, तर विदर्भातील नागपूरपर्यत धडक मारली. येत्या २४ तासांत पुणे, मुंबईसह उर्वरित महाराष्ट्रात मोसमी वारे पोहचणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला. बुधवारपर्यंत (२८ जून) राज्यातील विदर्भ आणि कोकणात मुसळधार ते अतिमुसळधार, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाजही हवामान विभागाने व्यक्त केला आहे.**

---

# लग्नाळूंसाठी गुड न्यूज! लग्नाच्या तारखेसाठी कार्यालयाचे हेलपाटे वाचणार

## » मुद्रांक विभागाने '2.0' ही ऑनलाइन प्रणाली केली कार्यान्वित

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नोंदणी मुद्रांक विभागाने विवाह नोंदणीसाठी '२.०' ही ऑनलाइन प्रणाली कार्यान्वित केली आहे. यामुळे नोटिशीचा कालावधी संपल्यानंतर दुसऱ्याच दिवसापासून दोन महिन्यांत कधीही लग्नाची तारीख ऑनलाइन ठरविणे शक्य होणार आहे. त्यासाठी नोंदणी कार्यालयात हेलपाटे मारावे लागणार नाहीत. पुणे, सोलापूर, नगर जिल्ह्यांमध्ये हा प्रयोग सुरू करण्यात आला असून, लवकरच राज्यभर ही प्रणाली कार्यान्वित केली जाणार आहे.**



राज्यातील जिल्हा मुख्यालयाचे दुय्यम निबंधक विशेष विवाह नोंदणीचे काम करतात. पुणे, मुंबई शहर आणि मुंबई उपनगर या तीन जिल्ह्यांसाठी विवाह नोंदणी अधिकाऱ्यांची स्वतंत्र कार्यालये आहेत. पूर्वी विवाहासाठी वधू-वरांना विवाह नोंदणी अधिकाऱ्याकडे एका महिन्यापूर्वी नोटीस द्यावी लागत होती. त्यानंतर कोणतेही आक्षेप न आल्यास नोटीस दिल्यापासून पुढील दोन महिन्यांत नोंदणी कार्यालयाकडून दिलेल्या तारखेला विवाह होत होता. पूर्वीच्या प्रणालीत अनेक तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने '२.०' ही नवी प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. यामुळे विवाह नोंदणीसाठीची सर्व प्रक्रिया सुटसुटीत होणार आहे.

### ऑनलाइन नोटीस देता येणार

विवाह नोंदणीसाठी '२.०' प्रणालीचा वापर करून विवाहोच्छुक वधू-वर विवाह अधिकाऱ्याकडे ऑनलाइन पद्धतीने नोटीस देऊ शकतात. नोटीस देण्यासाठी प्रत्यक्ष कार्यालयात जाण्याची गरज नाही. ऑनलाइन शुल्क जमा करता येईल. नोटिशीचा कालावधी संपल्यानंतर पुढील दोन महिन्यांत सोयीनुसार विवाहाचा मुहूर्त निश्चित करून त्या दिवसाची अपॉइंटमेंट ऑनलाइन घेणे शक्य झाले आहे. अपॉइंटमेंटच्या दिवशीच विवाह नोंदणी कार्यालयात उपस्थित राहून विवाह करता येईल.

### ऑनलाइन नोंदणी कशी होणार?

- » WWW.IGRMAHARASHTRA.GOV.IN या वेबसाइटला भेट देऊन विवाह नोंदणी '२.०'मध्ये लॉग इन करा.
- » वधू-वर आणि तीन साक्षीदारांची माहिती भरा. वय व रहिवासासंबंधी कागदपत्रे अपलोड करा.
- » फोटो अपलोडसह आधार पडताळणी करून अर्ज जमा करा.
- » विवाह अधिकाऱ्यांनी नोटिशीला मान्यता दिल्यानंतर ऑनलाइन शुल्क भरा.
- » विवाहाच्या तारखेची अपॉइंटमेंट बुक करा.
- » नियोजित तारखेदिवशी मूळ कागदपत्रे घेऊन विवाह नोंदणी कार्यालयात विवाह अधिकाऱ्यांसमोर विवाह करून प्रमाणपत्र मिळवा.

# अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. रवींद्र शोभणे यांची वर्णी

।पुणे। महाईन्यूज ।

भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. रवींद्र शोभणे यांची वर्णी लागली आहे. महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे यांनी ही घोषणा केली आहे. महामंडळाचे ९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन येत्या २ ते ४ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत पार पडणार आहे. अमळनेर येथील प्रताप विद्यालयाच्या पटांगणावर हे संमेलन होणार आहे.

साने गुरुजी यांची कर्मभूमी असलेल्या अमळनेर येथे अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाने आयोजित केलेल्या ९७ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कथाकार डॉ. रवींद्र शोभणे यांची निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा प्रा. उषा तांबे यांनी पुण्यामध्ये झालेल्या पत्रकार परिषेदत ही घोषणा केली.



तांबे यांच्या अध्यक्षतेत अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची बैठक रविवारी पुण्यात महाराष्ट्र साहित्य परिषेदेच्या कार्यालयात पार पडली. यामध्ये विविध घटक संस्थांकडून आलेल्या प्रस्तावित नावांवर चर्चा करण्यात आली. त्यातून डॉ. रवींद्र शोभणे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. या बैठकीला महामंडळाच्या कार्यवाह उज्वला मेहेंदळे, कोषाध्यक्ष प्रकाश पागे, उपाध्यक्ष रमेश वंसकर, 'मसाप' चे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार यांसह विविध पदाधिकारी या वेळी उपस्थित होते. महामंडळाचे ९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन येत्या २ ते ४ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत अमळनेर येथील प्रताप विद्यालयाच्या पटांगणावर होणार आहे.

# मिळकतकर थकबाकीदारांना 'अल्टिमेटम'

## दि. 1 जुलैपासून जप्तीची कारवाई : महापालिका प्रशासनाचा इशारा

| पिंपरी-चिंचवड | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पिंपरी- चिंचवड शहरातील नागरिकांनी ३० जूनपर्यंत मिळकतकर भरल्यास विविध सवलती महापालिकेने जाहीर केल्या आहेत. त्यांचा लाभ घेण्यासाठी अवघे पाच दिवस शिल्लक आहेत. थकबाकीसह चालू आर्थिक वर्षातील कर नागरिकांना भरता येणार आहे. एक जुलैपासून थकबाकीदारांवर मालमत्ता जप्तीची कारवाई करण्याचा इशारा, कर संकलन व कर आकारणी विभागाने दिला आहे.**






महापालिका ३० जूनपर्यंत संपूर्ण कराचा भरणा करणाऱ्यांना किमान दहा टक्के व कमाल २० टक्के सवलत देणार आहे. आतापर्यंत दोन लाख ५२ हजार २९६ मिळकतधारकांनी करभरणा करून विविध कर सवलतींचा लाभ घेतला आहे. त्यामुळे महापालिकेच्या तिजोरीत तब्बल ३३४ कोटी रुपये जमा झाले आहेत. ३१ मार्च २०२३ अखेर ५० हजारांपेक्षा जास्त थकबाकी असणाऱ्या ३९ हजार ६५५ मिळकती शहरात आहेत. त्यांच्या मालकांकडे तब्बल साडेसहाशे कोटी रुपयांचा कर थकीत होता. जप्ती पात्र मालमत्तांपैकी एक हजार ५९८ लोकांनी कराची काही रक्कम भरली आहे. त्यांची एकूण रक्कम ११ कोटींवर आहे. दोन हजार ५२४ नागरिकांनी संपूर्ण भरणा केला आहे. त्यांची रक्कमा २७ कोटींवर आहे. आतापर्यंतच्या ३३४ कोटी रुपयांमध्ये ऑनलाइन २३१ कोटी आठ लाख रुपयांचा भरणा झाला आहे.

### दरमहा दोन टक्के विलंब शुल्क



» विहित मुदतीत कर न भरल्यास कायद्यातील तरतुदीनुसार महिना दोन टक्के विलंब शुल्क आकारण्यात येते. हे विलंब शुल्क कायद्यातील तरतुदीनुसारच प्रत्येक दिवशी वाढत राहते. त्यामुळे करांची थकबाकी ठेवणे, हे अंतिमतः मिळकतधारकांसाठी आर्थिक नुकसानीचे आहे. जप्तीची कारवाई टाळण्यासाठी थकबाकीदारांनी थकीत कर भरावा, असे आवाहन कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी केले आहे.



" मिळकतकर थकबाकीदारांवर एक जुलैपासून जप्तीची कारवाई करण्याचे सूक्ष्म नियोजन केले आहे. त्या बंदोबस्तासाठी महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान असतील. दोन ते तीन झोन मिळून एक जप्ती पथक तयार केले आहे. येत्या तीन महिन्यात सर्व जप्तीपात्र मिळकतींवर कारवाई केली जाईल. नागरिकांनी ३० जून अखेर मिळकतकराचा भरणा करून महापालिकेला सहकार्य करावे.

**- शेखर सिंह,** प्रशासक, महापालिका.

# प्रा. रामकृष्ण मोरे यांच्या जीवनचरित्राचा 'परामर्श'

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची उपस्थिती: लेखक विजय जगताप यांच्या पुस्तकाचे गुरुवारी प्रकाशन

| पिंपरी | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पिंपरी चिंचवड शहराच्या विकासाचे शिल्पकार ठरलेले प्रा. रामकृष्ण मोरे यांच्या जीवन कार्यावरील ग्रंथाच्या प्रकाशनासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी गुरुवारी ( ता.२९) शहरात येत आहेत. रामकृष्ण हरी कृषी प्रतिष्ठान व अंशुल प्रकाशन यांच्या वतीने आकुर्डी येथील पीसीसीओई कॉलेजच्या सभागृहात सायंकाळी साडेचार वाजता होणाऱ्या या प्रकाशन सोहळ्याला मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंग हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.**

पत्रकार व लेखक विजय जगताप यांनी लिहिलेल्या व संपादन केलेल्या या ग्रंथामध्ये प्रा. रामकृष्ण मोरे यांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सहकार व सांस्कृतिक कार्याचा वेध घेण्यात आला असून महाराष्ट्राचे शिक्षण मंत्री असताना त्यांनी घेतलेले ऐतिहासिक व क्रांतिकारी निर्णय, विधिमंडळातील त्यांची गाजलेली भाषणे, त्यांचे शैक्षणिक कार्य तसेच देशभरातील मान्यवरांचे लेख, मुलाखती व इतिहासात दडलेल्या शेकडो घटना व घडामोडींच्या नोंदी या ग्रंथात मांडण्यात आल्या आहेत.

### मान्यवरांच्या उपस्थितीत होणार प्रकाशन...



» संत साहित्याचे अभ्यासक व माजी संमेलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असून पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलपती हर्षवर्धन पाटील, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन ट्रस्टचे डॉ. गजानन एकबोटे, अभिनव शिक्षण संस्थेचे राजीव जगताप आदींची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमाला प्रा. रामकृष्ण मोरे यांच्याबरोबर १९७० सालापासून काम केलेले त्यांचे सहकारी, मित्र, स्नेही, सनदी अधिकारी व चाहते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती रामकृष्ण हरी कृषी प्रतिष्ठानचे अध्यक्ष उल्हास दादा पवार व अंशुल प्रकाशनच्या संचालिका प्रा. तृप्ती जगताप यांनी दिली.

# पुणे जिल्ह्यात मॉन्सूनची जोरदार 'बॅटींग'!

## घाटमाथ्यावर मुसळधारची शक्यता : हवामान खात्याने वर्तवला अंदाज

| पुणे | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**तब्बल तीन आठवडे उशिरा दाखल झालेल्या मॉन्सूनच्या पावसाने जोरदार बॅटींगला सुरवात केली आहे. शनिवार (ता.२४) पासूनच शहरात हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडत असून, बुधवार (ता.२८) पर्यंत ही स्थिती कायम राहील. तसेच याच काळात पुणे जिल्ह्यातील घाटमाथ्यावर मुसळधार पाऊस पडेल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविली आहे.**



अरबी समुद्रात नुकतेच येऊन गेलेल्या बिपरजॉय चक्रीवादळाने मॉन्सूनची प्रगती रोखली होती. चक्रीवादळ ओसरल्यानंतर मागील आठवड्यात मॉन्सूनच्या प्रगतीसाठी पोषक वातावरण तयार झाले. अन् शनिवारी २४ तासांत मॉन्सूनने महाराष्ट्रासह देशाचा ९० टक्के भाग व्यापला. एकाच दिवसात दिल्ली, मुंबई आणि नागपूरमध्ये मॉन्सून दाखल झाल्याची दुर्मिळ घटनेची नोंद झाली. पुणे शहरातही मागील ४८ तासांपासून मॉन्सूनचा पाऊस पडत असून, पुढील चार दिवस परिस्थिती अशीच असल्याने पुणेकरांनी घराबाहेर पडताना रेनकोट आणि छत्री सज्ज ठेवावी. काही निवडक ठिकाणी मध्यम स्वरूपाच्या जोरदार पावसाची शक्यताही वर्तविण्यात आली आहे. आजवर ३५ मिलिमीटर पाऊस यंदाच्या मोसमात पुणे परिसरात रविवार (ता.२५) पर्यंत ३४.९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. साधारणपणे या कालावधीपर्यंत पुणे परिसरात सरासरी १२३.३ मिलिमीटर पाऊस पडायला हवा. यंदा सरासरी पेक्षा ८८.४ मिलिमीटर कमी पाऊस पडला आहे. सरासरीच्या तुलनेतील ही तूट शेवटच्या आठवड्यात कमी होईल, अशी आशा आहे.

# भाजीपाला महागला म्हणून फुकाचे गळे काढणाऱ्यांनो!




**आपल्या देशात सत्तर टक्के लोक शेती करतात. भारत शेतीप्रधान देश असल्याचे म्हटले जाते आणि त्याचा आपल्याला अभिमानही वाटत असतो परंतु वर्षभरात कधीतरी शहरात राहणाऱ्या शेती,मातीची माहिती नसणाऱ्या लोकांनी शेतीच्या बाजूने किंवा शेतकऱ्यांच्या बाजूने एखादा तरी निर्णय घेतला आहे काय ? याच्या उत्तरात आपल्या हातात काहीच पडत नाही. शेतमाल कवडीमोलाने विकत घेण्याची मानसिकता ज्या दिवशी संपेल त्या दिवशी आपण शेतीच्या बाजूने काहीतरी निर्णय घेतला असे हक्काने सांगण्याचा अधिकार शहरी नागरिकांना आपोआप प्राप्त होईल.**

असे काहीही न करता नोकरदार लोकांच्या डोक्यात उलट शेतकरी वर्गाविषयी गैरसमज निर्माण करण्यात येतात आणि अनेक लोक त्याने ग्रस्त होऊन विनाकारण शेतकऱ्यांच्या बाबत असंख्य गैरसमज बाळगत असतात. बँकांची कर्जे व्यसनात घालवून दरवर्षी यांना बरी कर्जमाफी हवी असते हा एक त्यातला मोठा गैरसमज आहे.

शेती हा तसाही तोट्याचा व्यवहार आहे परंतु दुसरा काहीच इलाज नाही म्हणून शेतकरी शेतीत राबत आहे हे आता अनेक अभ्यासाने सिद्ध झाले आहे. ज्यांना अन्य पर्याय गवसले ते शहाणे शेतकरी शेतीतून बाहेर पडत आहेत. जे शेती कसतात त्यांच्या मालाला आजवर कधीच चांगला भाव मिळाला नाही. कोणत्याही उत्पन्नाच्या भावाची स्थिर असण्याची गॅरंटी नाही. जोडधंदा म्हणून जे भाजीपाला पिकवतात आणि घरात न खाता अगोदर शहरात आणतात त्यांचा माल कवडीमोलाने कसा मिळेल यावर शहरी ग्राहक टपलेला असतो. कधीतरी भाजीपाला महागला की शहरी पत्रकार शोध पत्रकारितेचा जणू पुरस्कार



मिळाला या अविर्भावात , गृहिणीचे बजेट कोलमडले,आता मुलांना डब्यात काय द्यायचे ? अश्या बातम्या देऊन शेतकऱ्यांची टिंगल उडवत असतात. मुलांच्या हट्टापायी ३०० रुपयांचा पिझ्झा देताना बजेटची कोणत्याही गृहिणीला काळजी वाटत नाही ,दहा रुपयांनी महागलेला भाजीपाला कसे काय बजेट बिघडवतोय ?

उत्पन्न जास्त झाले की भाव कोसळतात हा बाजाराचा नियम आहे अशावेळी जास्त उत्पन्न घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या पाठीशी कुणीही उभे राहताना दिसत नाही. ज्या बाजार समित्या त्याला पूरक ठराव्यात म्हणून निर्माण झाल्या ,तिथेही अडत्यांनी आणि व्यापाऱ्यांनी त्याच्या शोषणाच्या नव्या व्यवस्था तयार केल्या आहेत. जेव्हा जास्त उत्पन्न झालेल्या कांद्याचे भाव मातीमोल होतात तेव्हा कांदा फेकण्याची अगतिकता शेतकरी करतो वारं बाजाराचे आधुनिक तंत्रज्ञान त्याला कुणी सांगितले नाही. कांदा ,कोबी,टमाटर,वांगी ,पालेभाज्या जड अंतःकरणाने शेतकरी जेव्हा फेकतो किंवा शेतात गाडून टाकतो तेव्हा त्यावर प्रक्रिया करणारे पूरक उद्योग टाकून त्याला सावरण्याची संधी द्यावी असे कुण्या पुढारी किंवा शहरी नागरिकाला का वाटत नाही ? या उलट महागल्या भाजीपाल्याचे भांडवल केले जाते आणि त्याला शहरी पत्रकार मोठ्या प्रमाणात हातभार लावत शेतकऱ्यांच्या सरणावर एकेक काडी टाकत असतात.

बाजारात शेतकऱ्याने हिरवा हरभरा आणला कि त्याला किलोला ५० रुपये भाव देताना आम्हाला भयंकर वेदना होतात आणि याच हरभऱ्याची डाळ जेव्हा ८० ते १०० रुपये किलोने किराणा मालात येते तेव्हा त्यावर अवाक्षर कुणी काढत नाही. शेतकऱ्याने ४० रुपये किलोने विकलेल्या तुरीची डाळ जेव्हा बाजारात १२० रुपये किलोने व्यापारी विकतो तेव्हा त्याचा निषेध आणि वाढत्या भावाची चिंता कोणती गृहिणी किंवा एखादा पत्रकार करताना दिसत नाही हेच ते शेतकऱ्याला सरणावर ढकलण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न असतात. कांदा जेव्हा स्वस्त होतो तेव्हा महिन्याचा साठा घरात करून करा ना, कांदा रेसिपी पंधरवडा किंवा मास साजरा ,तुम्हाला रोखले कुणी ? शहरी लोकांच्या डोक्यात केवळ कृत्रिम महागाई टाकून आणि शेतकरी जणू महाग भाजीपाला विकून गावात इमल्यावर इमले चढवीत असल्याचा जो आभास निर्माण केला जात आहे तो आधी बंद व्हायला हवा.

कधीतरी वाढलेल्या किमती आणि फुगलेला बाजार हे सगळे व्यापाऱ्यांचे षडयंत्र असते यात शेतकरी कुठेही सहभागी नसतो. शेतकऱ्यांचा भरोसा अजूनही ज्यांनी वर्षानुवर्षे फसवले त्याच बाजार समित्यांवर असतो आपला माळ तिथेच नेवून अडत्यांच्या पुढे भावाची याचना त्याला करावी लागते हे सगळे भयंकर आहे. कधीतरी बाजार समितीच्या आवारात जाऊन सोने पिकवणाऱ्या शेतकऱ्यांची अवस्था कशी आहे याचे शहरी नागरिकांना पर्यटन करायला हरकत नाही. गावात पन्नास एकर शेताची मालकीण कोणत्या साड्या नेसते आणि शहरात लिपिकाच्या राणीच्या वाट्याला कोणती लाईफ स्टाईल येते हेही बघूनघ्या म्हणजे शेतीच्या अन शेतमालाच्या महागाईवर बोटे मोडणाऱ्यांना अस्मान दिसायला मदत होईल. ज्यांना शेतीमातीची कदर असेल किमान त्यांनी तरी फुकाचे गळे काढू नयेत किंवा जे गळे काढतात त्यांना आरसा दाखवून जमिनीवर येण्यास मदत केली पाहिजे तरच शेतकऱ्यांचे जगणे किंचित सुसह्य झाले असे होईल.

## संपादकीय »


### बँकिंग व्यवस्थेचा मागोवा

***बँका या अर्थव्यवस्थेच्या नाड्या असतात. बँकिंगच्या माध्यमातून अनेक स्रोत समाजाच्या विविध घटकांपर्यंत पोहोचत असतात.***

यामध्ये सर्वसामान्य नागरिक, उद्योग, वित्तसंस्था या सर्वच घटकांचा समावेश होतो. विकास, वृद्धी, सामाजिक-आर्थिक न्याय या सर्वांना बँकिंगमधून चालना मिळते. बँकिंग हा शब्द म्हटलं तर आपल्या रोजच्या वापरातला. बँकिंग व्यवहार आपण सारे रोजच करत असतो. प्रत्यक्ष बँकेच्या शाखेत जाऊन म्हणा, एटीएमद्वारे म्हणा, ऑनलाइन म्हणा किंवा मोबाइलवरून म्हणा, आपण बँकिंग व्यवहार करत असतो. अगदी कालपर्यंत बँकेच्या शाखेत गेल्यावरच पूर्ण होणारे बँकिंग व्यवहार आज महिनोन्महिने त्या शाखेचे तोंडही न पाहता सुविहित होत असतात. तंत्रज्ञानाची ही कमाल आहेच. त्याचबरोबर बँकिंगनेही काळानुसार स्वरूप बदलले. या नव्या स्वरूपाचा धावता मागोवा ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि रिझर्व्ह बँकेचे विभागीय संचालक डॉ. आशुतोष रारावीकर यांनी 'इंडियन बँकिंग इन रिट्रोस्पेक्ट' या आपल्या छोटेखानी पुस्तकात केला आहे.

**संज्ञानात्मक चेताशास्त्रज्ञ ह्यूगो स्पायर्स यांच्या मते, मेंदूमधील एका विशिष्ट यंत्रणेमुळे हे लोक नेहमी उशिरा येतात, कारण तिथे जाण्यासाठी कमी वेळ लागेल, असा त्यांचा अंदाज असतो. मेंदूचा हिपोकॅम्पस हा भाग वेळेच्या काही पैलूंवर प्रक्रिया करतो.**

## नेहमीच लेटलतीफ का?



एखादी गोष्ट केव्हा करायची आणि तिच्यासाठी किती वेळ लागतो, हे हा भाग लक्षात ठेवतो. हिप्पोकॅम्पसमधील न्यूरॉन्स तथा मज्जापेशी या 'वेळ पेशी' म्हणून भूमिका बजावतात. घटना लक्षात ठेवण्याचे कार्य त्या करतात. मात्र, लेटलतीफ प्रवृत्तीशी त्याचा नेमका संबंध काय, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. गर्दी व संगीतासारखे पर्यावरणीय घटक वेळेचे आकलन बिघडवू शकतात, असेही अभ्यासात समोर आले. 'नेचर रिव्ह्यूज न्यूरोसायन्स' या विज्ञानपत्रिकेत हे संशोधन प्रसिद्ध झाले आहे.

उशिरा येणाऱ्या लोकांमध्ये व्यक्तिमत्त्वाची भूमिका महत्त्वाची असते. अमेरिकेतील अभ्यासक एमिली वॉल्डमन यांच्या मते व्यक्तिमत्वातील काही वैशिष्ट्यांमुळे, जसे की कमी विवेकबुद्धी, काही जण त्यांनी ठरवलेली कामे विसरतात. शिवाय, एकाच वेळी अनेक कामे करण्याचे त्यांचे कसब किती आहे, यावरही वक्तशीरपणा अवलंबून असतो. काहींना शेवटच्या क्षणापर्यंत चालढकल करण्याची सवय असते.

काहींमध्ये वेळेच्या व्यवस्थापनाचे कौशल्य नसते. वेळेचे भान ठेवू शकत नसल्यामुळे त्यांना नेहमीच उशीर होतो. तर काहींमध्ये अटेंशन डेफिसीट हायपर ॲक्टिव्हिटी डिसऑर्डर (एडीएचडी) म्हणजे 'अवधान अस्थिरता अतिचंचलता' ही विकृती असते. अशांना वेळेचे व्यवस्थापन करण्यात खूप अडचणी येतात. दुसरीकडे, काही लोकांमध्ये अल्प आत्मसन्मान किंवा असुरक्षिततेची भावना प्रबळ असते. त्यामुळे हे कार्यक्रमांना किंवा बैठकांना उशिरा येतात. काहींना सर्व काही व्यवस्थित, परिपूर्ण होईपर्यंत एखादे काम सुरू करणे कठीण जाते. अशांना अधिक उशीर होतो. सतत उशिरा येणाऱ्यांमध्ये चिंता, एकाग्रतेचा अभाव किंवा मानसिक कलह ही कारणे असू शकतात. एका व्यक्तीमध्ये यातील एकाहून अधिक कारणे असू शकतात.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।  
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥  
नव्हे आराणुक लौकिकापासून ।  
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मान्सूनची जोरदार एन्ट्री!

## राज्यासह देशात मुसळधार: मुंबई-दिल्लीत 62 वर्षात जे झालं नाही ते घडलं

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुंबईच्या विविध भागांमध्ये रविवारी सकाळीही पावसाने उपस्थिती लावली. त्यानंतर मात्र जोर कमी झाला. दुपारच्या सुमारास सांताक्रूझ, खार, जुहू, वर्सोवा या भागात संततधार असल्याची माहिती स्थानिकांनी दिली, मात्र या पावसाचा जोर फारसा नव्हता.**




मान्सूनचे वारे पुन्हा सक्रीय झाल्यानंतर अवघ्या २४ तासांमध्ये मान्सूनने महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश पार करत दिल्लीपर्यंत झेप घेतली. तसेच गुजरात, राजस्थानच्या काही भागांमध्येही मान्सून रविवारी दाखल झाला. मुंबई आणि दिल्लीमध्ये तब्बल ६२ वर्षांनी मान्सून एकत्र दाखल झाला आहे. मुंबईमध्ये दोन आठवडे विलंबाने, तर दिल्लीमध्ये मात्र दोन दिवस आधी मान्सून दाखल झाला आहे.शनिवारी सकाळी ८.३० ते रविवारी सकाळी ८.३० या वेळेत मुंबईमध्ये सांताक्रूझ येथे १७६.१ मिलीमीटर, तर कुलाबा येथे ८६ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. मान्सून आगमनाच्या निकषांची पूर्तता झाल्याने मुंबईमध्ये मान्सूनचे आगमन झाल्याचे भारतीय हवामान विभागातर्फे रविवारी जाहीर करण्यात

### मुंबईमध्ये मान्सूनचे आगमन



मुंबईच्या विविध भागांमध्ये रविवारी सकाळीही पावसाने उपस्थिती लावली. त्यानंतर मात्र जोर कमी झाला. दुपारच्या सुमारास सांताक्रूझ, खार, जुहू, वर्सोवा या भागात संततधार असल्याची माहिती स्थानिकांनी दिली, मात्र या पावसाचा जोर फारसा नव्हता. मुंबईत सांताक्रूझ येथे रविवारी सकाळी ८.३०पासून सायं. ५.३०पर्यंत केवळ १७.८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. तर, कुलाबा येथे ३४ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. शनिवारी दिवसभर पडलेल्या पावसाचा परिणाम म्हणून मुंबईच्या कमाल तापमानात शनिवारपेक्षा घट नोंदली गेली. सांताक्रूझ येथे शनिवारपेक्षा ३.८ अंशांनी तापमान खाली उतरून २९ अंश सेल्सिअस, तर कुलाबा येथे ३.३ अंशांनी तापमान खाली उतरून २७.५ अंश सेल्सिअस कमाल तापमान रविवारी नोंदले गेले. दोन्ही केंद्रांवर किमान तापमानाचाही पारा उतरला आहे. रविवारी सांताक्रूझ येथे २३.६, तर कुलाबा येथे २४ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली.

---

## “उद्धवजी, तुमको मिरची लगी तो मै क्या करूँ”, देवेंद्र फडणवीसांची खोचक टीका

। पिंपरी । महाईन्यूज



ठाकरे गटाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये राजकीय आरोप-प्रत्यारोपांचा चांगलाच कलगीतुरा रंगताना सध्या पाहायला मिळत आहे. आधी देवेंद्र फडणवीसांनी पाटण्यात विरोधी पक्षांच्या झालेल्या बैठकीवरून उद्धव ठाकरेंना लक्ष्य केल्यानंतर उद्धव ठाकरेंनीही कार्यकर्त्यांच्या बैठकीतून देवेंद्र फडणवीसांना प्रत्युत्तर दिलं. आता त्यावर पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीसांकडून उद्धव ठाकरेंवर खोचक टीका करण्यात आली आहे.

नरेंद्र मोदी सरकारला नऊ वर्षं पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर रविवारी चंद्रपूरमध्ये भाजपाकडून जाहीर कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात बोलताना देवेंद्र फडणवीसांनी उद्धव ठाकरेंना टोला लगावला. तसेच, यावेळी त्यांनी शरद पवारांनाही लक्ष्य केलं.“१९७८ मध्ये शरद पवार हे वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळातील ४० आमदार घेऊन बाहेर पडले होते. त्यांनी तेव्हाच्या भाजपाबरोबर सरकार स्थापन केलं. ते सरकार दोन वर्षं चाललं. पंतप्रधान इंदिरा गांधींनी ते सरकार बरखास्त केलं नसतं तर ते सरकार पाच वर्षं चाललं असतं. म्हणजे तेव्हा पवारसाहेबांनी जे केलं ती मुत्सद्देगिरी आणि तेच एकनाथ शिंदे यांनी केलं तर गद्दारी? असं कसं चालेल?” असा खोचक सवाल देवेंद्र फडणवीसांनी केला.

## “तुम्ही सहा मुस्लीम देशांवर बॉम्बहल्ले केले”

### निर्मला सीतारामन यांचं बराक ओबामांना प्रत्युत्तर!

। पाटणा । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी अलीकडेच भारतातील अल्पसंख्यांक मुस्लिमांवर होणाऱ्या अत्याचाराबाबत चिंता व्यक्त केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी अमेरिकेच्या तीन दिवसीय दौऱ्यावर असताना ओबामा यांनी हे वक्तव्य करण्यात आलं. यावर केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी रविवारी तिखट प्रतिक्रिया दिली.**


ओबामा यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना निर्मला सीतारामन म्हणाल्या की, बराक ओबामांमुळे सहा मुस्लिमबहुल देशांवर बॉम्बस्फोट झाले. पंतप्रधान मोदी जेव्हा अमेरिकेच्या दौऱ्यावर होते, तेव्हाच अमेरिकेच्या माजी राष्ट्राध्यक्षांनी (बराक ओबामा) भारतीय मुस्लिमांबद्दल वक्तव्य करणं, हे आश्चर्यकारक आहे. निर्मला सीतारामन पुढे म्हणाल्या, “मी अत्यंत जबाबदारपणे बोलत आहे. आम्हाला अमेरिकेशी चांगले मैत्रीपूर्ण संबंध ठेवायचे आहेत. पण कदाचित त्यांच्यामुळेच (ओबामा) सहा मुस्लिमबहुल देशांवर बॉम्बस्फोट झाले होते. तरीही ते भारतातील धार्मिक सहिष्णुतेवर टिप्पण्या करत आहेत. ओबामांच्या कार्यकालात सीरिया ते येमेन आणि सौदी अरेबिया ते इराक अशा देशांवर बॉम्बस्फोट झाले नाहीत का? तेव्हा सात देशांमध्ये युद्धाजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. या देशांत सुमारे २६ हजार बॉम्ब टाकले होते. असे नेते (बराक ओबामा) जेव्हा भारताच्या धार्मिक सहिष्णुतेवर भाष्य करतात, तेव्हा त्यांना कोण गांभीर्यानं घेणार?”



### नेमकं प्रकरण काय?

खरं तर, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी वॉशिंग्टन डीसीमध्ये संयुक्त पत्रकार परिषद घेतली होती. यानंतर लगेचच अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांची एक मुलाखत ‘सीएनएन’ वृत्तवाहिनीने प्रसारित केली. ज्यामध्ये ओबामा म्हणाले की, त्यांना जर मोदींशी चर्चा करण्याची संधी मिळाली तर ते भारतातील मुस्लीम अल्पसंख्याकांच्या हक्कांवर चर्चा करतील. मुस्लिमांचे मानवी अधिकार संरक्षित करण्यासाठी तुम्ही काय पावलं उचलत आहात, असं मी मोदींना विचारेन, असं ओबामांनी म्हटलं होतं.

# 10व्या दिवशी 'आदिपुरुष'च्या कमाईत थोडी वाढ



ओम राऊत दिग्दर्शित 'आदिपुरुष' चित्रपट प्रदर्शित होऊन आज १० दिवस झाले आहेत. हा चित्रपट १६ जून रोजी सिनेमागृहांमध्ये प्रदर्शित झाला होता. सुरुवातीचे तीन दिवस बॉक्स ऑफिसवर धमाल करणाऱ्या या चित्रपटाची चौथ्या दिवसापासून घसरण सुरू झाली ती अद्याप कायम आहे. पण, त्यातल्या त्यात रविवारी २५ जून रोजी चित्रपटाच्या कमाईत २४ जूनपेक्षा थोडी वाढ झाल्याचं पाहायला मिळालं. शनिवारी चित्रपटाने ५.२५ कोटी रुपयांची कमाई केली होती, आता रविवारची आकडेवारी समोर आली आहे. त्यानुसार शनिवारपेक्षा कमाईत थोडी वाढ झाली आहे. सॅकनिल्कच्या सुरुवातीच्या ट्रेंड रिपोर्टनुसार, रविवारी 'आदिपुरुष'च्या कमाईत थोडीशी वाढ झाली आहे आणि बॉक्स ऑफिसवर त्याने जवळपास ६ कोटींची कमाई केली आहे. यानंतर चित्रपटाचे एकूण कलेक्शन आता २७४.५५ कोटी रुपये झाले आहे. तब्बल ६०० कोटींच्या प्रचंड बजेटमध्ये बनलेला 'आदिपुरुष' चित्रपट रिलीजच्या १० दिवसांनंतरही ३०० कोटींचा आकडा गाठण्यापासून खूप दूर आहे. चित्रपटाच्या कमाईचा वेग पाहता ३०० कोटींच्या क्लबमध्ये सामील होणेही कठीण झाले आहे. निर्मात्यांनी वादग्रस्त संवाद बदलूनही चित्रपटाला त्याचा फारसा फायदा झालेला नाही.

# "माझ्यासोबत सिगारेट प्यायला येशील का?" शाहरुख खानने चाहत्यांच्या प्रश्नांना दिली दिलखुलास उत्तरं"




अभिनेता शाहरुख खान सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. नुकतीच शाहरुखने बॉलिवूडमध्ये ३१ वर्षे पूर्ण केली. त्यानिमित्ताने त्याचे चाहते त्याचे फोटो व व्हिडिओ आनंद व्यक्त करत आहेत. यानिमित्ताने शाहरुखने ट्विटरवर #ASKSRK सेशन ठेवलं. यामध्ये त्याला चाहत्यांनी अनेक मजेदार प्रश्न विचारले व त्याची उत्तरं त्याने दिली.

एका चाहत्याने त्याला विचारलं की 'तू ५७व्या वर्षीही ॲक्शन स्टंट कसे परफॉर्म करतो?' त्यावर 'खूप साऱ्या पेनकिलर्स खाव्या लागतात भावा', असं उत्तर शाहरुखने दिलं.

'सोबत सिगारेट प्यायला येणार का?' असा प्रश्न एका चाहत्याने विचारला. 'त्यावर मी माझ्या वाईट सवयी एकटाच करतो', असं उत्तर शाहरुखने दिलं.

दरम्यान, शाहरुखला बॉलिवूडमध्ये ३१ वर्षे पूर्ण झाल्यानंतर २५ जून रोजी चाहते त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत होते. त्याने चाहत्यांसाठी वेळ काढत





# 'कियारा अडवाणी प्रेग्नंट आहे का?

**मुंबई: 'शेरशाह' फेम बॉलिवूड कपल सिद्धार्थ मल्होत्रा आणि कियारा अडवाणी यांनी फेब्रुवारी २०२३ मध्ये लग्नगाठ बांधली. या सिनेमामध्ये दिसलेली त्यांची केमिस्ट्री खऱ्या आयुष्यातही पाहायला मिळाली. दोघांच्या स्वप्नवत लग्नसोहळ्याचे फोटो आणि व्हिडिओ आजही चर्चेत आहेत. दरम्यान लग्नानंतर चारच महिन्यांनी कियारा प्रेग्नंट असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. अभिनेत्रीचा एक लेटेस्ट फोटो समोर आला असून तो पाहून नेटकऱ्यांना ती प्रेग्नंट आहे का असा प्रश्न पडला आहे.**

कियारा सध्या तिच्या आगामी सिनेमाच्या प्रमोशनमध्ये व्यग्र आहे. कार्तिक आर्यन आणि कियारा अडवाणी स्टारर 'सत्यप्रेम की कथा' हा सिनेमा २९ जून रोजी रिलीज होणार आहे. मराठमोळा दिग्दर्शक समीर विद्वांस दिग्दर्शित या सिनेमाचा ट्रेलर आणि गाण्यांना प्रेक्षकांनी पसंती दिली आहे. सिनेमाची संपूर्ण टीम जीव ओतून प्रमोशन करते आहे. दरम्यान हे कलाकाल अलीकडेच राजस्थानमध्ये होते आणि याठिकाणचे काही फोटो सोशल मीडियाद्वारे समोर आलेत. जयपूरमध्ये त्यांनी त्यांच्या 'सत्यप्रेम की कथा' या सिनेमाचे दणक्यात प्रमोशनही केले.

अख्ख्या शहरात नाही कुणाकडे अशी कार, महेश बाबूच्या ताफ्यात नवी गाडी; थक्क करणारी किंमत

कार्तिक आणि कियाराच्या एका फोटोमध्ये ते दोघे हातात हात घेऊन एकमेकांकडे बघत आहेत. हा फोटो समोर आल्यानंतर कियारा प्रेग्नंट असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. सोशल मीडियावर युजर्सनी सवाल केला की, 'कियारा अडवाणी प्रेग्नंट आहे का?' अन्य एकाने लिहिले की, 'सर्वांना बेबी बम्प स्पष्टपणे दिसत आहे, नाही का?' एकाची अशी कमेंट आहे की, 'कियारा प्रेग्नंट आहे असं मलाच वाटतंय, की सर्वांना असंच वाटतंय?'

# पती कतरिना कैफच्या जब तक है जान चित्रपटासाठी विकी कौशलने दिली होती ऑडिशन

कतरिना कैफ आणि विकी कौशल ही बॉलीवूडमधील लोकप्रिय जोडी आहे. डिसेंबर २०२१ मध्ये लग्नगाठ बांधत त्यांनी नव्या आयुष्याला सुरुवात केली. मात्र, विकी-कतरिनाने अद्याप एकाही चित्रपटात एकत्र काम केलेले नाही. कतरिना कैफने काम केलेल्या एका चित्रपटासाठी विकीने ऑडिशन दिली होती परंतु त्याला नकार देण्यात आला. तो चित्रपट नेमका कोणता आहे जाणून घेऊयात...

शाहरुख खान आणि कतरिना कैफ यांच्या 'जब तक है जान' या चित्रपटात अभिनेता शारिब हाशमीने शाहरुख खानच्या जवळच्या मित्राची म्हणजेच 'जैन मिर्झा'ची भूमिका साकारली होती. या 'जैन मिर्झा'च्या भूमिकेसाठी अभिनेता विकी कौशलने सुद्धा ऑडिशन दिली होती. मात्र, पुढे त्याला या भूमिकेसाठी नकार कळवण्यात आला. त्यानंतर चित्रपटात ही भूमिका शारिबने साकारली.



विकी कौशल आणि सारा अली खानच्या अलीकडेच प्रदर्शित झालेल्या 'जरा हटके जरा बचके' चित्रपटात शारिब सुरक्षा रक्षकाच्या भूमिकेत दिसला होता. अलीकडेच 'आज तक'ला दिलेल्या मुलाखतीत शारिब हाशमीने 'जब तक है जान'च्या भूमिकेबाबत खुलासा केला. शारिब म्हणाला, विकी कौशलने 'जब तक है जान'साठी शाहरुखच्या जिवलग मित्राच्या भूमिकेसाठी ऑडिशन दिली होती.

# आशियाई क्रीडा स्पर्धा: बीसीसीआयचे घुमजाव!

## आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेट संघ पाठवायचा की नाही, याबाबत जोरदार चर्चा

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेट संघ पाठवायचा की नाही, याबाबत जोरदार चर्चा सुरु होती. पण अखेर बीसीसीआयने याबाबत घुमजाव केला आहे. बीसीसीआयने यावेळी कोणता मोठा निर्णय घेतला आहे.**



भारतीय क्रिकेट बोर्डाने (बीसीसीआय) आशियाई क्रीडा स्पर्धेतील भारतीय संघाच्या सहभागाबाबत अचानक घूमजाव केले असल्याचे समजते. चीनमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारताचा पुरुष आणि महिला क्रिकेट संघ पाठवण्याचा निर्णय बीसीसीआयने घेतला असल्याचे वृत्त आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेतील क्रिकेट स्पर्धा टी-२० स्वरुपाची आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेची सांगता होण्यापूर्वीच भारतातील वर्ल्ड कप वन-डे क्रिकेट स्पर्धेस सुरुवात होणार आहे. त्यामुळे आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताचा दुय्यम संघ सहभागी होईल; मात्र महिलांच्या स्पर्धेत अव्वल संघ सहभागी होण्याची शक्यता आहे. आशियाई क्रीडा स्पर्धा २३ सप्टेंबर ते ८ ऑक्टोबरदरम्यान होईल, तर वर्ल्ड कप वन-डे स्पर्धा ५ ऑक्टोबर ते २३ नोव्हेंबरदरम्यान होण्याची शक्यता आहे. भारतीय ऑलिम्पिक संघटनेने आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी अंतिम संघ पाठवण्यासाठी राष्ट्रीय संघटनांना ३० जूनची मुदत दिली आहे. त्यानुसार भारतीय क्रिकेट बोर्ड ३० जूनपूर्वी आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी संघांची घोषणा करणार आहे. यामुळे आशियाई क्रीडामधील क्रिकेट स्पर्धेत भारताचा प्रथमच सहभाग असेल. यापूर्वी २०१० आणि २०१४ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेत क्रिकेटचा समावेश होता; मात्र त्या वेळी भारतीय क्रिकेट बोर्डाने संघ पाठवण्यास नकार दिला होता. आशियाई क्रीडा स्पर्धा पूर्वनिश्चित कार्यक्रमानुसार गतवर्षी

### ऑलिम्पिकमध्ये समावेश : आयसीसी प्रयत्नशील

२०१८ च्या आशियाई क्रीडा स्पर्धत क्रिकेटला स्थान नव्हते; पण यंदाच्या एशियाडमध्ये क्रिकेटचाही समावेश आहे. आमचा कार्यक्रम यापूर्वीच निश्चित झालेला आहे, असे कारण भारतीय क्रिकेट बोर्डाने यापूर्वीच्या बहुविध स्पर्धांतील सहभागास नकार देताना दिले होते. भारताच्या महिला संघाने गतवर्षीच्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक जिंकले होते. १९९८ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताचा पुरुष क्रिकेट संघ गटसाखळीत तिसरा आला होता. लॉस एंजलिस येथे २०२८ मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिकमध्ये क्रिकेटचा समावेश करण्यासाठी आयसीसी प्रयत्नशील आहे.

'क्रिकेटव्यतिरीक्त जवळपास अन्य सर्व क्रीडा प्रकारांत भारताचा सहभाग असेल. भारतीय क्रिकेट बोर्डाने आशियाई क्रीडा स्पर्धेपासून स्वतःला दूरच ठेवले आहे. आम्ही स्पर्धेसाठी खेळाडूंच्या प्रवेशिका पाठवण्याबाबत प्रत्येक क्रीडा संघटनेस सांगितले होते; तसेच बीसीसीआयलाही सांगितले होते. तीन-चार इमेल पाठवूनही बीसीसीआयने एकाही इ-मेलला उत्तर दिलेले नाही,' असे आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी असलेल्या भारतीय पथकाचे पथकप्रमुख भूपेंदर बाजवा यांनी सांगितले होते.

# ब्रिजभूषण सिंह यांच्याविरोधातील कुस्तीपटूंचं आंदोलन मागे!




। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

कुस्तीगीर महासंघाचे मावळते अध्यक्ष ब्रिजभूषण सिंह यांच्यावर महिला कुस्तीपटूंनी लैंगिक शोषणाचा आरोप केला होता. याप्रकरणात ब्रिजभूषण सिंह यांच्या अटकेच्या मागणी करत गेल्या ५ महिन्यांपासून कुस्तीपटूंचं आंदोलन सुरु होतं. पण, न्यायालयात चार्जशीट दाखल झाल्याने रस्त्यावरील लढाई थांबवण्याचा निर्णय कुस्तीपटूंनी घेतला आहे. याबाबत कुस्तीपटू साक्षी मलिकने माहिती दिली आहे. ट्वीट करत साक्षी मलिक म्हणाली की, "कुस्तीपटूंची ७ जूनला सरकारबरोबर बैठक झाली. या बैठकीत सरकारने दिलेल्या आश्वासनानुसार लैंगिक शोषण प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. दिल्ली पोलिसांनी तपास पूर्ण करत १५ जूनला चार्जशीट दाखल केलं आहे. त्यामुळे न्याय मिळेपर्यंत कुस्तीपटूंची रस्त्यावरील लढाई आता न्यायालयात सुरु राहिल."

"कुस्ती महासंघाच्या निवडणूक प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. कुस्तीसंघाची ११ जुलैला निवडणूक होऊ शकते. सरकाराने दिलेल्या आश्वासनांच्या अंमलबजावणीची आम्ही वाट पाहू," असेही साक्षी मलिकने म्हटलं आहे. महिला कुस्तीपटूंचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप भाजपा खासदार ब्रिजभूषण सिंह यांच्यावर करण्यात आला होता. त्याप्रकरणी ब्रिजभूषण सिंह यांच्या अटकेची मागणी करत कुस्तीपटू पाच महिन्यांपासून आंदोलन करत आहेत. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहचले होते. याप्रकरणी न्यायालयात चार्जशीटही दाखल करण्यात आली आहे.

# सुनील गावस्करांची बीसीसीआयवर जोरदार टीका

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**सध्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेतील भारताचा कसोटी संघ निवडताना विचारात घेतली जाणार नसेल, तर ही स्पर्धा खेळवता कशाला अशी विचारणा दिग्गज सलामीवीर सुनील गावस्कर यांनी केली. गेल्या तीन मोसमात सातत्याने शंभरच्या सरासरीने धावा करीत असलेल्या सर्फराज खानची निवड न झाल्याने गावस्कर यांनी टीका केली आहे.**



भारतीय कसोटी संघाची निवड करताना रणजी करंडक स्पर्धेऐवजी आयपीएलमधील कामगिरीस प्राधान्य देण्यात आल्यामुळे गावस्कर नाराज आहेत. "सर्फराज खानने गेल्या तीन मोसमात शंभरच्या सरासरीने रणजी स्पर्धेत धावा केल्या आहेत. भारतीय कसोटी संघात स्थान मिळवण्यासाठी एखाद्या खेळाडूने यापेक्षा अधिक काय करायला हवे. कदाचीत त्याला अंतिम संघात स्थान देणे शक्य होणार नाही. त्याची संघात निवड करायला काय हरकत आहे," अशी विचारणा गावस्कर यांनी केली.

कसोटी जगज्जेतेपद लढतीतील पराभवासाठी चेतेश्वर पुजाराला बळीचा बकरा केले, अशी टीका गावस्कर यांनी केली. त्याचवेळी पुजाराचे विराट कोहली, रोहित शर्मासारखे समाजमाध्यमांवर लाखो पाठीराखे नाहीत, त्यामुळे त्याला वगळणे चुकीचे आहे, असेही गावस्कर यांनी सांगितले. भारतीय फलंदाजाच्या अपयशासाठी केवळ पुजाराला बळीचा बकरा का करता. तो भारतीय क्रिकेटचा निष्ठावान सेवक आहे. शांतपणे तो त्याचे काम करीत असतो. त्याला वगळले तर समाज माध्यमांवरून कोणीही टीका करणार नाही. त्यामुळेच तर त्याला वगळले. अन्यथा त्याला वगळण्याचे कारण काय हेच उमजत नाही, अशी खंत गावस्कर यांनी व्यक्त केली.

पुजाराला वगळण्याचे कारणच काय. सातत्याने अपयशी ठरत असलेले अन्य फलंदाज संघात कायम आहेत. आता संघनिवडीच्या माध्यमांच्या प्रश्नांना उत्तरे देण्याची वेळ निवड समितीच्या अध्यक्षांवर येत नाही.
कदाचित त्यामुळेच हे घडत असावे अशी टिप्पणी गावस्कर यांनी केली. पुजाराऐवजी तिसऱ्या क्रमांकावर यशस्वी जयस्वाल खेळण्याची शक्यता आहे.